Shivaji College of Arts ... li

# Printing Area ®

Peer Reviewed International Refereed Research Journal
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

## Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून आलेले सामाजिक जीवन. of Dr./Mr./Miss/Mrs. Sangita Narayanrao Mundhe.

It is peer reviewed and published in the Issue 76 Vol. 02 in the month of May 2021.

Thank you for sending your valuable writing for printing area Journal

Indexed (IIJIF)
Impact Factor 7.891
Govt.of India Trade Marks Registry Regd.No.3418002
ISSN 2394-5303

Editor in chief
Dr.Bapu G.Gholap

Shivaji College of Arts Hingoli

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**May 2021, Issue-76, Vol-02**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) STUDY OF IMPLICATIONS OF FOREIGN CAPITAL ON THE WAY OF INDIAN ... ||11
Prof.Dr. Abdul Rahim Shafi & Puja Kumari, Chapra, Bihar

02) The Covid-19 catastrophe has another face: Usage of the Digital Sources ... ||17
Asst. Prof. Atish chandrakant Akade, Dist. Latur, Maharashtra

03) Effects of academic stress and peer pressure on mental health of Of ... ||19
Dr.Anuradha & Deepshikha, Meerut

04) CORPORATE CRIMES- CORPORATE HUMAN RIGHTS ||22
Dr. BHAGWANA RAM BISHNOI, SALONI SHARMA & AMAN JAIN, BIKANER

05) A CRITICAL REVIEW ON DETECTION OF PICRAMIC ACID AND PICRAMATE IN ... ||28
Dr. Chandana Kumari, Bhagalpur, Bihar

06) Miniature Paintings Reinterpreted: Through the Visual World of Prof. M.K. ... ||31
Ms. Jaspreet Kaur, Patiala

07) Secularism: Concept, Obstacles and Strengthening Facilitators ||42
Dr. Rajesh Kushwaha, Agra

08) ENVIRONMENTAL ETHICS, ISSUES AND POSSIBLE SOLUTIONS ||52
Dr. Ramdas B. Madale, Dist Nanded

09) Kamala Markandaya's The Coffer Dams: A protest against exploitation ... ||54
Dr. Narendra T. Mane, Dist.Amravati(MS)

10) Libraries during a pandemic situation ||60
Dr. Jayant S. Meshram, Dist- Washim

11) DIGITAL LIBRARIES: AN OVERVIEW ||64
Miss Kalpana L. Murade, Dist Washim

12) THE THEMATIC STUDY OF V.S.NAIPAUL'S MIGUEL STREET ||68
Smt. Sonal Sudhakar Patil, Vaijapur

13) Digital Transformation of Education during COVID 19 and its Impact on ... ||72
Dr. Ranjana Sahu, Nagpur

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Shivaji College of Arts, Hingoli



59

Shivaji College Hingoli

14) Comparative study of Educational Philosophy of Certain Philosophers
**Rakeshkumar G. Shripateliya & Dr. Kamalnayan B. Parmar, Borsad** ||78

15) Tracing influences of Persian-Mughal Architecture in Punjab
**Mr.Atinderpal Singh, Patiala** ||83

16) A Study of the Impact of ICT on Saharsa District 9th Grader Social Study ...
**Nitu kumari Singh, Saharsa** ||92

17) Impact of Child's birth order and mother's education on Malnutrition: ...
**Tanwi Sinha & Saroj Sinha, Patna, Bihar, India** ||96

18) Effect of Parental Vocational Status to Fulfillment of Needs and Family ...
**Dr. Tarannum, Dongargarh, District- (C.G.)** ||101

19) A Review on Effect of the Weather Conditions on Sports Performance
**Sandip Thorat, Dapoli** ||105

20) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
**प्रा.डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे, ता. जि. बीड** ||109

21) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलधोरणातील योगदान
**डॉ.मीन बोर्डे-सुर्यवंशी, जालना** ||111

22) स्त्रीभ्रूणहत्या
**प्रा.वर्षा प्रभाकर गायकवाड, वैजापूर** ||113

23) इतिहास आढळत नाही (दीर्घ कविता) लखनसिंह कटरे
**प्रा.डॉ. अरविंद भ. कटरे, जि. भंडारा (म.रा.)** ||116

24) किशोरवयीन युवकांमधील स्मार्टफोन व्यसनाधिनता
**श्री. मारोती आंनदराव खिल्लारे, ता. जि. हिंगोली** ||120

25) बाह्य स्त्रोत (out sourcing) ही काळाची गरज
**डॉ. पवार जी.आर., हिंगोली** ||123

26) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून आलेले सामाजिक जीवन
**प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे, हिंगोली** ||127

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ment. New Delhi : Deep & Deep Publications.

9- Sigh, S.A. (2006). Six Sigma Concepts & Cases. Hyderabad : Nagarjuna Will.

१०. घटकार, (२००७). सिक्स सिग्मा ग्रंथालयासाठी उपयुक्त प्रणाली. टी. क्यु.एम. सोव्हीनिअर मराठवाडा विभाग सेमीनार. औसा.

११. हरकल, प्रभाकर. (२००४). व्यवसाय व्यवस्थापाची मुलतत्वे. औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिकेशन्स.

१२. घुमरे, शिवशंकर (२००२). ग्रंथालयाच्या गुणात्मक विकासासाठी परीवर्तनाचे व्यवस्थापन. ज्ञानगंगोत्री, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.

१३. दळवी, महेश. (२००२). माहिती तंत्रज्ञान युगातील शैक्षणिक ग्रंथालयाची भुमिका. ज्ञानगंगोत्री, य.च.म.मु.वि. नाशिक.

१४. कुलकर्णी, सु.(२००५). ज्ञानव्यवस्थापन नव्या युगातील नवे आव्हान. ज्ञानगंगोत्री, य.च.म.मु. वि. नाशिक.

१५. गणपुले, श.श. (२०००). व्यवस्थापन मुलतत्वे, कार्यपध्दती आणि मुल्यमापन ज्ञानगंगोत्री, य.च.म.मु.वि. नाशिक.

१६. कऱ्हाळे, बी.एम. (२००७). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपुर : पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लीशर्स.

१७. पारखी, गं. (२००१). ग्रंथालयशास्त्र परिचय. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

१८. बोधनकर, सु. (२००४). सामाजिक संशोधन पध्दती. नागपुर : श्री साईनाथ प्रकाशन.

19- Kumar, P.S.G. (2004). Research Methods in Library & Information Science. Delhi : Anand Publications.

२०. कायंदे, ग.वि. (२००६). संशोधन पध्दती. नाशिक : चैतन्य पब्लीकेशन.

२१. पाटील, व. वी. (२००५). शैक्षणिक कृती संशोधन. पुणे : नुतन प्रकाशन.

२२. पाटील, वा. भा. (२००६). संशोधन पध्दती. पुणे : प्रशांत पब्लीकेशन.

**26**

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून आलेले सामाजिक जीवन

**प्रा. डॉ. संगीता नारायणराव मुंढे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

***********

विसावे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासात वैचारिक क्रांतीचे शतक म्हणून ओळखले जाते. अनेक संत, समाजसुधारक, विचारवंत या शतकात होवून गेले. त्यांनी महाराष्ट्राच्या भूमिला वैचारिक वारसा निर्माण करून दिला. वैचारिक मशागती बरोबरच सामाजिक जीवनात असलेली विषमता नष्ट करण्यासाठी मौलाचे योगदान दिले. अशाच महत्त्वाच्या विचारवंतापैकी एक म्हणजे अण्णाभाऊ साठे हे होत. अत्यंत गरीब कुटुंबामध्ये व दलित समजल्या जाणाऱ्या मातंग समाजात १ ऑगष्ट १९२० रोजी अण्णाभांऊचा जन्म झाला. त्यावेळी सामाजिक विषमता मोठया प्रमाणावर होती. शिक्षणाची द्वारं स्त्री, शुद्रादिकांना खुली झाली असली तरी, शाळेतही मोठ्या प्रमाणावर विषमता पाळल्या जाई. त्यामुळे अण्णाभाऊ शाळेतही नाही गेले. जिथे आपल्याला हीन लेखतात अशा ठिकाणी जावून शिक्षण घेने त्यांच्या मनाला रूचले नाही. त्यांनी जे शिक्षण घेतले ते बिनभिंतीच्या व्यावहारीक जगात, अनुभवातून ते सर्व काही शिकले. त्यांना ही व्यवस्थाच बदलायची होती. यासाठी त्यांनी लेखनी हाती घेतली. आत्तापर्यंतच्या साहित्यापेक्षा आगळे वेगळे असे साहित्य निर्माण केले. लोकभाषेलाच त्यांनी साहित्याची भाषा बनविले. कोणताही एकच एक वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळला नाही तर त्यांना त्या काळानुरूप व परिस्थितीनुरूप लोकांना काहीतरी सांगायचे होते. हे सांगणे कधी कथेतून, कधी कादंबरी, नाटकातून तर कधी लोकनाटय, पोवाडा, चित्रपट इ. विविध प्रकारातून त्यांनी सांगितले. केवळ साहित्य लिहायचे म्हणून त्यांनी ते लिहिले नाही तर, आजूबाजूची परिस्थिती पाहून त्यांना ते व्यक्त होने गरजेचे वाटत होते. समाजजीवनाचे बहुविध स्वरूप पाहून त्यांनी लिखान केले.

अण्णाभाऊ हे व्यक्तिमत्त्व सजग असं व्यक्तिमत्त्व होतं. समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो ही त्यांची भूमिका होती. त्यासाठीच त्यांनी लेखनी हाती घेतली. अण्णाभाऊ हे जन्मतः कलाकार होते. त्यांचा आवाज गोड होता. त्यांनी आपल्या खडया आवाजात अनेक

Shivaji College ... Hingoli



लोकनाट्य गाइली. ते उत्तम दिग्दर्शक होते, प्रबोधनकार, पटकथाकार, संवादलेखक, वादक इ. विविध गुणानी त्यांचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण होते. साम्यवादाचा प्रभाव अण्णाभाऊवर होता. डाव्या चळवळीत ते सक्रीय होते. कम्यूनिष्ठ पक्षाचे ते सदस्य होते. त्यामुळे त्यांच्या विचाराची घडण त्या पद्धतीने झाली आहे. अण्णाभांऊच्या वैचारिक क्रातीवर खूप विश्वास होता. विचाराने माणूस बदलतो, वाचनाने माणूस बदलतो यावर त्यांचा ठाम असा विश्वास होता म्हणूनच त्यांनी लेखनीरूपी शस्त्र हाती घेतले. त्यांच्या लेखनामागची प्रेरणा ही सामाजिक स्वरूपाची होती. साहित्याच्या सामर्थ्यावर त्यांची निष्ठा होती. ते नेहमी आपल्या भाषणातून म्हणत,"साहित्य हे जसे संस्कृतीचे रक्षण करते तसे ते संस्कृतीचे संवर्धन करते.", "देशाच्या घटनेचे आणि प्रगतीचे वाङ्मय एक प्रभावशाली शस्त्र आहे."साहित्य हे जीवनाला समांतर असलं पाहिजे असं त्याचं म्हणनं होतं. त्याच पद्धतीने त्याचं सर्व लिखान आहे. ते जे जीवन जगले, त्यांनी जे जीवन सभोवती पाहिले तेच त्यांनी आपल्या कथा कादंब-यातून व्यक्त केले आहे. त्यांच्या साहित्यात कुठेही कल्पनाविलास नाही.वास्तवाचा धागा पकडूनच त्यांचंसाहित्य वाटचाल करतं, त्यांच्या साहित्याकडून काहीतरी अपेक्षा आहेत. आपण ज्या समाजात, देशात जन्मलो त्या समाजाचे, देशाचे आपण काहीतरी देणे लागतो अशी त्यांची भूमिका आहे. म्हणून त्याचं साहित्य समाजाला काहितरी देतं. भा. लं. ठाणगे यांच्या मते,"कुठल्याही समाजातील कर्तृत्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही. अण्णाभांऊ नी वास्तव जीवनात जे पाहिले, वाचले, अनुभवले तेच त्यांच्या साहित्य जीवनात मार्गदर्शक ठरले."१

अण्णाभाऊ साठे यांनी अनेक वाङ्मय प्रकारातून लिखान केले असले तरी आपण त्यांना ओळखतो ते कादंबरीकार म्हणून. त्यांनी एकूण छत्तीस कादंब-या लिहील्या. 'चित्रा' (१९५१) ही त्यांची पहिली कादंबरी तर 'अग्निदिव्य'(१९६९) ही त्यांची शेवटची कादंबरी होय. विषय आणि आशयाच्या बाबतीत सर्वच कादंब-यात वैविध्य आहे.त्यांच्या कादंब-या या ऐकिव गोष्टीवर आधारीत नाहित तर त्यांनी जे अनुभव घेतले, आजूबाजूला जे पाहिले तेच त्यांच्या कादंब-याचे विषय झाले आहेत. त्यांच्या सर्वच कादंब-या या प्रामुख्याने व्यक्तिचित्रणपर आहेत. ही व्यक्तिचित्रणे समाजासमोर एक प्रेरणा बनून उभी राहीली आहेत. त्यांच्या कादंब-यातील नायक, नायीका या अतिशय कनिष्ठ समाजातील आहेत पण त्या आपल्या अंगच्या कतृत्वाने ते समाजापुढे एक आदर्श म्हणून उभे करतात. त्यांच्या कादंबरीतील कुठलेही पात्र परिस्थिती प्रतिकुल आहे म्हणून रडत, कुडत बसत नाही तर त्यावर मात करायला शिकवते. भा. ल. ठाणगे म्हणतात,"ते प्रत्यक्ष ज्या समाजात जगले त्या समाजातील व्यक्तिच त्यांच्या कादंबरीचे नायक ठरले आणि त्यांनी समाजाच्या वेदना कादंब-यात लिहिल्या त्यातून त्यांच्या सामाजिक बांधिलकीची सहज कल्पना येते."२

अण्णाभाऊंनी आपल्या कादंबऱ्यातून धडपडणा-या , झगडणा-या, प्रेम करणा-या, लढणा-या माणसांची चित्रे रंगवून दिशाहीन, स्वत्वहिन झालेल्या समाजाच्या पुढे एक आदर्श उभा केला.आण्णाभाऊंच्या कादंब-यातून आलेले नायक हे अतिशय प्रतिकुल परिस्थितून पुढे आलेले होते. त्यामुळे हे नायक म्हणजे सामान्य माणसाला आपले प्रतिनिधी वाटत होते. त्यांच्यामध्ये एक नवी उमेद, विश्वास निर्माण करण्याचं काम अण्णाऊ च्या कादंबऱ्यांनी केले.ज्या कादंबरीने अण्णाभाऊंना कादंबरीकार म्हणून सर्वत्र मान्यता मिळवून दिली ती कादंबरी म्हणजे 'फकिरा' ही होय. 'फकिरा' ही केवळ फकिरा किंवा राणोजीची जीवन कहाणी नाही तर संपूर्ण मानवी समुहाची ती गाथा आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते," फकिरा ग्रामपातळीवरील संघर्षाची कथा आहे. हा संघर्ष कोणावर तरी विजय मिळवावा यासाठी नाही, तर आपल्या गावाला समृद्धी मिळावी यासाठी आहे. किंबहुना या प्रेरणेतूनच हा संघर्ष् सुरू होतो. पुढे या संघर्षाने वळण घेतलेले दिसते. स्वतःची प्रतिष्ठा जपण्यासाठी, स्वाभिमान व्यक्त करण्यासाठी संघर्ष झडत राहतो. त्यातून आपल्या जातिव्यवस्थेतील ताणतणाव मुखर होत जातात. . . . . . 'फकिरा' ही सामाजिक व सांस्कृतिक पातळीवरील एक महत्त्वाचे घटित ठरते."३ अशाच पद्धतीने 'चित्रा', 'आवडी', 'माकडीचा माळ', 'वारणेचा वाघ', 'अलगुज' इ. कादंब-यातून अण्णाभाऊ काहीतरी सांगू पाहातात. सर्वच कादंब-यातून अण्णाभाऊ काहीतरी सांगू पाहातात. सर्वच कादंब-यांना वास्तवाचा आधार आहे. माणसामध्ये एक नवी उमेद, विश्वास निर्माण करण्याचे काम त्यांच्या कादंब-या करतात.आदर्श भारतीय स्त्रीचे चित्रण त्यांच्या अनेक नायिकाप्रधान कादंब-यातून आले आहे. कादंबऱ्या प्रमाणेच अण्णाभाऊंनी कथाही मोठया प्रमाणावर लिहील्या. त्यांचे अनेक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्याच माणसांची कहाणी स्वतःच्या शब्दात सांगितली आहे. त्यामुळे त्यांच्या सर्वच कथा या वास्तव जीवनदर्शन घडवणा-या आहेत. उपेक्षित समाजाबद्दल अण्णाभाऊंना अत्यंतिक कळवळा होता. तेही याच समाजातून आले होते. त्यामुळे या समाजातील माणसांच्या व्यथा, वेदनांना त्यांनी कथेच्या माध्यमातून व्यक्त केले.

भा. ल. ठाणगे म्हणतात,"त्यांची प्रत्येक कथा ही जीवंत हाडामासाच्या माणसांना मृतपाय वेदना भोगाव्या लागणा-या लोकाविषयी त्यांनीदिलेल्या अंतर्बाहय स्वरूपाचा वृत्तांत आहे." ४त्यांच्या कथा अतिशय वास्तव व पारदर्शक आहेत. अण्णाभाऊंच्या अंगी असलेली सामाजिक जाणीव त्यांच्या सर्वच कथेतून आलेली दिसते. ते ज्या समाजात जीवन जगत होते त्या समाजाची संस्कृती, परंपरा, जीवनपद्धती या सर्वांचे चित्रण आले आहे. 'खुळवाडी', 'चिरागनगरीची भुतं', 'फरारी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'पिसाळलेला माणूस', 'बरबादया कंजारी', 'आबी', 'मरीआईचा गाडा' इ. अनेक कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्या कथेतून अनेक विषय हाताळले बदलते जीवन, बदलते संदर्भ, बदलत्या राजकीय, सामाजिक घडामोडी त्यांनी कथेचे विषय

बनवले. जसा काळ तशा त्यांच्या कथा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे बदलत्या मानवी जीवनाचे चित्रण त्यांची कथा करते.

अण्णाभाऊ हे व्यक्तिमत्व मुळात कवी ज्हदयाचे होते. त्यांच्या एकूण साहित्य लेखनाची सुरवात काव्य लेखनाने झाली आहे. अण्णाभाऊंना लोकशाहिर म्हणून ओळखले जाते, तेलावणी आणि पोवाडयाच्या रचनेमुळे. त्यांचा आवाज गोड होता. तत्कालीन समाजवास्तवावर त्यांनी लोकनाटय व पोवाडे रचले व ते स्वत:च्या आवाजात गायीले त्यामुळे ते समाजातील सर्व तळागाळातील लोकांपर्यंत जावून पोहोचले. त्यांची 'माझी मैना' ही लावणी १९४८ ला प्रसिद्ध झाली. दुहेरी अर्थ प्रतिपादन करणारी ही लावणी खुप गाजली. प्रथमच त्यांनी लावणीतून सामाजिक आणि राजकीय विषय आणला. त्यांनी मोजक्याच लावण्या लिहिल्या. गिरणी कामगारावर होणा-या अन्याय, अत्याचाराचे वर्णन करणारी 'लवादाचा ऐका परकार' ही लावणी प्रसिद्ध आहे. अण्णाभाऊंनी काव्य करत असतांना जुन्या छंदाचे बंधन नाकारले. काव्याला नवीन वळण देण्याचा प्रयत्न केला. लोकगीत सद्रुष्य रचना त्यांनी केली. त्यांची सर्वच काव्यरचना ही वास्तव जीवनानुभव मांडणारी आहे. पुरोहीत वर्गावर , अत्याचारी गावगुंडावर, जुलुम करणाज्या व्यवस्थेवर त्यांनी आपल्या काव्यातून कोरडे ओढले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयावर त्यांनी अनेक काव्य रचली. सामाजिक जीवनाची जाण आणि भान त्यांना होती. त्यमुळे व्यसनाचे दुष्परिणाम संगीताच्या माध्यमातून खेडोपाडयात जावून ऐकविले. अनेक सामाजिक विषय त्यांनी काव्यातून व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांची भेट ही एक क्रांतीकारक घटना म्हणावी लागेल. दोघानाही ध्यास उपेक्षितांच्या मुक्तिचा व सामाजिक समतेचा होता. डॉ.बाबासाहेबांचे मोठेपण अण्णाभाऊंनी काव्यातून व्यक्त केले.

"जग बदल घालूनी घाव  
सांगून गेलेत मजला भीमराव."

अण्णाभाऊं नी काही पोवाडेही रचले आहेत. त्यात स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बंगालची हाक अमळनेरचे अमर हुतात्मे मुंबईचा कामगार इ. पोवाडयाचे जुने तंत्र घेऊन त्यात त्यांनी वर्गीय लढयाचा नवा क्रांतदर्शी आशय ओतला. समाजाला कृतीप्रवन करण्याचे काम त्यांच्या पोवाडयाने केले आहे. त्यांच्या काव्यामुळेच अण्णाभाऊ तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन पोहोचले.

अण्णाभाऊंच्या लिखाना पाठीमागचा मुख्य हेतू हा लोकांचे हीत हाच होता. आत्मविस्मृत झालेल्या उपेक्षित, बहुजन समाजाला त्यांचा आत्मसन्मान परत मिळवून दयायचा होता, यासाठीच त्यांनी साहित्याची वेगवेगळी माध्यमे हाताळली. नाटक किंवा लोकनाटय हेही यापैकीच एक. नाटय ही कला अधिकाधिक समाजजीवनाशी संवादी असते असे त्यांचे मत होते. त्यामुळेच त्यांनी नाटके लिहिली. १९४८ साली लिहिलेले ईनामदार हे त्यांचे पहिले नाटक होय. सदय परिस्थितीवर हे नाटक आधारीत होते. त्यांची सर्वच नाटके लोकप्रिय झाली. पारंपारिक तमाशात बदल करून त्यांनी जोकनाटय लिहिली. लोकजागृती, लोकशिक्षण, लोकप्रबोधन हेच त्यांच्या लोकनाटयाचं उद्दिष्ट होतं. 'माझी मुंबई', 'बेकायदेशीर शेटजीचं इलेक्शन', 'निवडनुकितील घोटाळे', 'देशभक्त घोटाळे', 'खाप-या चोर', 'अकलेची गोष्ट', 'मूक मिरवणूक', 'पुढारी मिळाला', 'बिलंदर बुडवे', 'दुष्काळात तेरावा' इ. लोकनाटय त्यांची जगभर गाजली. यातून त्यांची सामाजिक जाणीव दिसून येते. पारंपारिक तमाशाचा घाट फक्त घेऊन अंतरंग पुर्णत: बदलून नवे लोकनाटय, वंगनाटय निर्माण केले. नानासाहेब कंठाळे म्हणतात, "विद्रोही लोकनाटय, वंगनाटय निर्माण केले. नानासाहेब कंठाळे म्हणतात,"विद्रोही वैचारिक कळस चढविला आणि एक स्वतंत्र तात्त्विक अधिष्ठान लोकनाटयाला दिले."५

सुप्रसिदध साम्यवादी नाटककार भा. वि. वरेरकर यांनी त्यांच्या अकलेची गोष्ट या लोकनाटया बद्दल म्हटले आहे, "अकलेच्या या गोष्टीत अण्णाभाऊंची अक्कल निश्चित दिसली. आम्हा मराठी नाटककांरानीही या अकलेच्या गोष्टीपासून अक्कल शिकायला हवी."६ यातून काळाच्या पुढे जाणारी दृष्टी अण्णाभाऊकडे होती हे समजते. डॉ. भगवान ठाकूर म्हणतात,"अण्णाभाऊं नी मराठी साहित्यातिल जीवनलक्षी साहित्याचा प्रवाह विस्तृत आणि समृद्ध केला. उपेक्षितांच्या साहित्याला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता प्राप्त करून दिली. मानवमुक्तीच्या लढयात सम्यक क्रांतीचे तत्त्वज्ञान घेऊन ठाम उभे असलेले नायक नायिका त्यांनी प्रथमच मराठी साहित्यातून जन्माला घातले.७

अशा पद्धतीने माणूस आणि मानवी हीत हाच त्यांच्या लिखानाचा केंद्रबिंदू होता. माणसाच्या अंत:सामर्थ्यावर त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे प्रतिकुल परिस्थिती असूनही त्यांच्या साहित्यातील माणूस ही परिस्थिती बदलून टाकतो. सामान्य माणसाच्या ठिकाणी जगण्याची एक नवी उमेद विश्वास निर्माण करतो.सामाजिक जाणीव ही त्यांच्या लेखनाच्या पाठीमागची मुलभूत प्रेरणा आहे.

**संदर्भ**

१) ठाणगे भा. ल.-साहित्यिकांचे साहित्यिक अण्णाभाऊ साठे, लक्ष्मण प्रकाशन,पुणे. प.आ.२०१४ पृ.५३

२) तत्रैव पृ.१०१

३) डॉ. कोत्तापल्ले पागनाथ, 'फकरा'च्या निमित्तान- साहित्यास्वाद- संपादक, प्रा. शैलेश त्रिभुवन,कू. एस. पब्लिकेशन्स, पुणे. २००६ पृ. १५४

४) ठाणगे भा. ल.-साहित्यिकांचे साहित्यिक अण्णाभाऊ साठे, लक्ष्मण प्रकाशन,पुणे. प.आ.२०१४ पृ.१०१

५) कंठाळे नानासाहेब - अण्णाभाऊ साठे : जीवनआणि साहित्य, साहित्य प्रकाशन मंच नागपूर. प्र. आ.१९९६ पृ.७६

६) कंठाळे नानासाहेब - अण्णाभाऊ साठे : जीवन आणि साहित्य, साहित्य प्रकाशन मंच नागपूर. प्र. आ.१९९६ पृ.८१

७) डॉ. ठाकूर भगवान - आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर.प्र. आ.२००९ पृ.११९



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Hingoli (MS.)